सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

क्रमांक:-डिओओ-२०२४/तीन/२०१३ दिनांक:- 9 SEP 2024

प्रति,

...................................

...................................

विषय : **६४ वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०२४-२५.**

कलाकार विभागाचे अर्ज व माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत .

व्यावसायिक कलाकार विभागाचे प्रदर्शन मुंबई येथे आयोजित केले जाणार आहे. त्या संदर्भातील माहितीपत्रक या पत्रासोबत जोडले असून प्रवेशाचे ऑनलाईन अर्ज कला संचालनालयाच्या www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.०४.११.२०२४ पासून उपलब्ध करुन देण्यात येतील.

२. प्रदर्शनाच्या प्रवेशिका दि.०४/११/२०२४ ते दि.१४/११/२०२४ या कालावधीत www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात स्विकारल्या जातील.

३. ऑनलाईन इमेज साईज संदर्भात:- डिजीटल इमेज ही जेपीईजी (JPEG) मध्ये असावी. त्याची साईज किमान २१०० पीक्सेल लांबी / रुंदी (आडवी बाजू किंवा उभी बाजू). २५०० पिक्सेलपेक्षा जास्त साईज नसावी.

उदा. ऑनलाईन इमेज ५ X ७ इंच व ३०० डीपीआय (DPI) असेल तर ती १५०० पीक्सेल X २१०० पिक्सेल होईल.

४. फाईल फॉरमॅट :- ईमेज ही जेपीईजी (JPEG) मध्येच असावी. ईमेज फाईलचे नाव पुढील प्रमाणे असावे, कलाकाराचे नाव_ विभाग_कलाकृतीचे शिर्षक_कलाकृतीचे माध्यम_कलाकृतीची किंमत

**उदा:** Ashok-Kadam_Painting_Landscape_Water Colour_२९०००.jpg

५. कलाकारांनी ऑनलाईन स्वरुपात कलाकृती सादर करतांना अधिवासाबाबतचा (Domicile Certificate) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला दाखला अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा कलाकृती बाद केल्या जातील.

६. ऑनलाईन डिजीटल इमेजेस वरुन प्रदर्शनाकरिता कलाकृतींची निवड केली जाईल. प्रदर्शनाकरिता निवडण्यात आलेल्या कलाकृतीची यादी उक्त संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल.

७. **प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती** स्वीकारण्याच्या तारखा व ठिकाण उक्त संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. प्रदर्शनाकरीता निवड झालेल्या कलाकृती या संचालनालयास प्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर त्यातून पारितोषिकाकरीता कलाकृतींची निवड करण्यात येईल. पारितोषिक पात्र कलाकारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

८. **सदर तारखात काही बदल झाल्यास तसे** www.doa.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

९. वरील प्रक्रियेबाबत अद्ययावत सूचना वेळोवेळी उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. तरी संबंधितांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देऊन अद्ययावत माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच प्रदर्शनाच्या अनुषंगाने अटी शर्तींचे माहितीपत्रक सोबत जोडले आहे.

(राजीव मिश्रा)

प्र.कला संचालक

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## ६४ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन २०२४-२५

## कलाकार विभाग

## डीजीटल व निवड झालेल्या कलाकृती सादर करण्याकरिता माहितीपत्रक / सुचना / नियम व अटी

महाराष्ट्रातील विविध कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सन १९५६ पासून महाराष्ट्र शासन प्रतीवर्षी राज्य कला प्रदर्शन ही सांस्कृतिक महत्वाची योजना राबवित आहे. ६४ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन खाली नमूद केलेल्या विभागनिहाय अयोजित करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. १) रेखा व रंगकला, २) उपयोजित कला, ३) शिल्पकला, ४) मुद्राचित्रण ५) दिव्यांग (अपंग) कलाकार विभाग या विभागात निवड झालेल्या कलाकृतीस खालीलप्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्रे देण्यात येतील.

| अ.क्र. | विभागाचे नाव | पारितोषिक संख्या | पारितोषिकाची रक्कम (प्रत्येकी) (रुपयात) |
|---|---|---|---|
| १ | रेखा व रंगकला | ६ | रु.५२,५००/- |
| २ | उपयोजित कला | ५ | रु.५२,५००/- |
| ३ | शिल्पकला | २ | रु.५२,५००/- |
| ४ | मुद्राचित्रण | १ | रु.५२,५००/- |
| ५ | दिव्यांग कलाकार विभाग | १ | रु.५२,५००/- |
| | एकूण | १५ | |

अटी व नियम :-

१) प्रदर्शन पात्र, पारितोषिक पात्र कलाकृती निवडीबाबत समितीचा निर्णय अंतीम राहील.

२) **स्पर्धक हा महाराष्ट्राचा कायम स्थानिक रहिवाशी असला पाहिजे. अधिवासाबाबतचा दाखला www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रदर्शनासाठी उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर अपलोड करणे आवश्यक असून तद्नंतर कलाकृतीची प्रदर्शनासाठी निवड झाल्यास कलाकृती प्रत्यक्ष सादर करताना सदर कलाकृतीसोबत अधिवास दाखला (डोमिसाईल) सादर करणे बंधनकारक राहील. प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृतीसोबत अधिवास दाखला सादर न केल्यास सदर कलाकृती स्पर्धेमधून बाद करण्यात येईल. महाराष्ट्रातील अधिवासाबाबत दाखला संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेण्यात यावा.**

३) या माहितीपत्रकातील नमूद केलेले सर्व नियम व अटीची पुर्तता न झाल्यास प्रदर्शनासाठी पाठवलेल्या कलाकृती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४) प्रत्येक विभागा करिता रु.२००/- प्रवेश फी ऑनलॉईन स्वरुपात स्विकारण्यात येईल. प्रत्येक विभागात दोन पेक्षा अधिक कलाकृती पाठविता येणार नाहीत. कोणत्याही कला शाखेत विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कलाकार विभागात भाग घेता येणार नाही.

५) राज्यकला प्रदर्शनात ज्या कलाकारांना एकाच विभागात तीन वेळा पुरस्कार प्राप्त झालेला आहे, अशा कलाकारांच्या कलाकृतींचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येणार नाही.

६) कला प्रदर्शनामध्ये सादर करण्यात येणाऱ्या सर्व विभागातील कलाकृतींमध्ये दिव्यांग (अपंग) कलाकाराने सादर केलेल्या कलाकृतीस खास पारितोषिक देण्यात येत असल्यामुळे दिव्यांग कलाकाराला शरीराच्या वरच्या अथवा खालच्या भागातील किमान कायम स्वरुपाची ४० टक्के विकलांगता आहे किंवा वरच्या आणि खालच्या भागातील मिळून कायम स्वरुपाची ५० टक्के विकलांगता असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे

प्रमाणपत्र www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रदर्शनासाठी उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर अपलोड करणे आवश्यक आहे. **सदर कलाकृतीची प्रदर्शनासाठी निवड झाल्यास कलाकृती प्रत्यक्ष सादर करताना कलाकृतीसोबत दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृतीसोबत सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर कलाकृती स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.**

७) दिव्यांग कलाकारांना सामान्य विभाग व दिव्यांग विभाग अशा दोन्ही विभागात भाग घेता येईल. त्यांनी दोन्ही विभागात भाग घेतल्यास दोन्ही विभागाची रक्कम भरावी लागेल.

८) प्रदर्शनामध्ये विक्री होणाऱ्या कलाकृतीच्या विक्रीच्या २० टक्के रक्कम वजाती करुन उर्वरित रक्कम कलाकारास प्रदान केली जाईल व वसूल केलेल्या २० टक्के रकमेची शासकीय पावती संबंधित कलाकाराला देण्यात येईल.

९) कलाकृतीचे विभागानुसार आकारमान खालीलप्रमाणे.

| विभाग | कमीत कमी | जास्तीत जास्त |
|---|---|---|
| रेखा व रंगकला विभाग | ४० से.मी. x ३० से.मी. | १२० से.मी. ते १५० से.मी. |
| मुद्राचित्रण विभाग | | |
| उपयोजित कला विभाग | ४० से.मी. x ३० से.मी. | ७५ से.मी. x ५० से.मी. |
| छायाचित्रण विभाग | | |
| शिल्पकला विभाग | १२० से.मी. x १२० से.मी. x ९० से.मी.<br>वजन १२५ किलोपेक्षा जास्त नसावे. | |

१०) एखाद्या विभागात कलाकृतीचा दर्जा पारितोषिकाकरीता पात्र न ठरल्यास त्या विभागाकरिता पारितोषिक दिले जाणार नाही.

११) प्रदर्शनात पाठविलेली कलाकृती ही अन्य कलाकृतीची नक्कल किंवा प्रतिकृती नसून ती पूर्णत: स्वत:ची निर्मिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन प्रत्येक कलाकृतीसोबत सादर करणे आवश्यक आहे, सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर कलाकृती प्रदर्शनाकरिता स्विकारली जाणार नाही.

१२) प्रत्येक कलाकृती काचेविना योग्य चौकट केलेली असावी. कलाकृती असलेल्या पेटीचे झाकन स्क्रुने बंद करावे.

१३) **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृती** या संचालनालयाकडून नमूद केलेल्या तारखेस पाठविण्यात याव्यात. नियोजित वेळेनंतर येणाऱ्या कलाकृती स्विकारल्या जाणार नाहीत.

१४) **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृतीची योग्य ती देखभाल केली जाईल. परंतु नैसर्गिक किंवा अन्य अनपेक्षित कारणाने कलाकृतीचे नुकसान झाल्यास अथवा ती गहाळ झाल्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. आवश्यक वाटल्यास पाठविणाऱ्याने कलाकृतीचा विमा उतरवावा.**

१५) कलाकार विभागात आणून दिलेल्या कलाकृती परत घेऊन जाण्याची व्यवस्था प्रदर्शन समाप्त झाल्यानंतर १० दिवसांचे आत करावी. या मुदतीत कलाकृती नेण्याची व्यवस्था न केल्यास त्याची जबाबदारी कला संचालनालयाकडे राहणार नाही. कुठल्याही कारणासाठी प्रदर्शनाच्या मुदतीत कलाकृती परत मिळणार नाहीत. कलाकृती विहीत कालावधीत परत न घेऊन गेल्यास कलाकृती खराब झाल्यास किंवा कोणत्याही नुकसानास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. त्याबाबतची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. प्रदर्शनासाठी पाठविण्यात येणारी कलाकृती सादर करण्याची व ती विहीत कालावधीत परत नेण्याची जबाबदारी संबंधित कलाकाराची राहिल.

१६) **कलाकारांची नावे किंवा स्वाक्षरी चित्राच्या समोरील बाजूस किंवा चित्रावर असू नये. तसे आढळल्यास सदर कलाकृती तात्काळ बाद करण्यात येईल.**

१७) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या प्रत्येक कलाकृतीच्या मागील बाजूस कलाकाराने फक्त त्यांचा **ऑनलाईन रजिस्टर आयडी व भाग घेतलेला विभाग** ठळक व स्पष्ट अक्षरात नमूद करावा, त्याच्या व्यतिरिक्त इतर काही मजकूर असल्यास सदर कलाकृती बाद ठरविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| कलाकाराचा ऑनलॉईन रजिस्टर आयडी | : | ........................................................... |
| विभाग (रेखा व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला, मुद्राचित्रण दिव्यांग (अपंग) यापैकी) | : | ................................................... |

१८) राज्यकला प्रदर्शनाच्या कलाकार विभागाच्या कलाकृती निवड प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सदस्यास / उमेदवारास राज्यकला प्रदर्शनामध्ये कलाकृती सादर करता येणार नाही.

१९) महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात भाग घेतलेल्या कलाकृतीबाबत काही वाद अथवा पेचप्रसंग उद्भवल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार हा प्रदर्शन समिती तसेच कला संचालकांचा राहील.

---------- x ----------